**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ– शिष्यवृत्ती वाटप

Pune 22 Jul 2021 Page 5

खेड विभाग

पुणे जिल्हा खेड विभाग सकाळ TODAY

# उच्च शिक्षणासाठी १२९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## राजगुरुनगरला प्रातिनिधिक स्वरूपात वितरण; सागर पिंगळे, आकांक्षा वाडेकर यांचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

राजगुरुनगर, ता. २१ : पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या देणगीतून, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मागील दोन वर्षातील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लोकनेते शरद पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ४६ विद्यार्थिनींना, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती ४५ विद्यार्थिनींना, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती १९ विद्यार्थ्यांना आणि दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती १९ विद्यार्थ्यांना देण्यात आली.



राजगुरुनगर (ता. खेड) : आकांक्षा वाडेकर हिचा सत्कार करताना अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक.

> शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये, म्हणून या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, दृष्टिहीन-दिव्यांग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.
> – ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, अध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत ८ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश देण्यात आले. नुकताच सीएची परीक्षा उत्तीर्ण झालेला महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी सागर पिंगळे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात, पदवी परीक्षेत अकाउन्टसी विषयात सुवर्णपदक मिळविलेली विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकर यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

या प्रसंगी संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ॲड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

**नवराष्ट्र**

सहाय्य | खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम

# १२९ विद्यार्थ्यांना ८ लाखांच्या शिष्यवृत्तीचे वाटप

**राजगुरूनगर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लोकनेते शरदरावजी पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या माध्यमातून मागील दोन वर्षातील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.



## पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

यापसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ॲड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४६ विद्यार्थिनींना सुमारे २ लाख ९२ हजार रु., शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे ३ लाख १८ हजार, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना ९२ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख ३० हजार असे एकूण ८ लाख ३३ हजार रूपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.

## प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द

कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत ८ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द करण्यात आला. नुकतेच सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर पिंगळे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षेत अकौन्टसी विषयात सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी शिष्यवृत्तीसाठी ठेव स्वरूपातील आर्थिक मदतीबद्दल लोकनेते शरद पवारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये या भूमिकेतून संस्थेच्या वतीने या विद्यार्थ्यांची निवड केली असल्याचे सांगितले. या शिष्यवृत्तीचा उपयोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कारणासाठी करावा अशी सूचना केली. तसेच शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यांच्या जीवनात यशस्वी झाल्यावर सामाजिक योगदानाची भावना कायम मनात जपून ठेवावी असे आवाहन केले. यापसंगी ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, धर्मराज पवळे, सी.ए. सागर पिंगळे, आकांक्षा वाडेकर यांनी मनोगते व्यक्त केली.

Pune Edition
15 July 2021 Page No. 8
epaper.navarashtra.com

पुढारी

# तब्बल १२९ विद्यार्थ्यांना साडेआठ लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप



शिष्यवृत्तीचे वाटप करताना ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील व इतर मान्यवर.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लोकनेते शरद पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टे-पाटील आणि दत्तात्रय वळसे-पाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजिण्यात आला. या माध्यमातून मागील दोन वर्षांतील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक कोंडिभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ॲड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४६ विद्यार्थिनींना सुमारे २ लाख ९२ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे ३ लाख १८ हजार, साहेबरावजी बुट्टे-पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना ९२ हजार, तसेच दत्तात्रय वळसे-पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख ३० हजार असे एकूण ८ लाख ३३ हजार रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.कोरोनाप्रतिबंधक नियमांचे पालन करीत ८ शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द करण्यात आला. नुकतेच सी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर पिंगळे, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षेत अकौन्टन्सी विषयात सुवर्णपदकप्राप्त विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, धर्मराज पवळे, सी. ए. सागर पिंगळे, आकांक्षा वाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. टाकळकर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Jul 15, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# राजगुरू महाविद्यालयातील १२९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## ८ लाख ३३ हजार रुपये सुपूर्द : आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात वाटप

**राजगुरूनगर, दि. २० (प्रतिनिधी)** - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील १२९ विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजार रूपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप केले.

शरद पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे सावित्रीबाई फुले, शारदा पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ॲड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, प्रा. मच्छिंद्र मुळूक, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४६ विद्यार्थिनींना सुमारे २ लाख ९२ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे ३ लाख १८ हजार, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना ९२ हजार, दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख ३० हजार असे एकूण ८ लाख ३३ हजार रूपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.



**राजगुरूनगर : सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकरचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

करोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत ८ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द करण्यात आला. नुकतेच सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर पिंगळे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षेत अकाउंटन्सी विषयात सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकर तर वाणिज्य शाखेच्या प्रा.पायल ओसवाल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आल्याने यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रभात Wed, 21 July 2021
https://epaper.eprabhat.net/c/61937455

वर्ष : १४० Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी
राष्ट्रीय ठेवा

• अंक ३३२ • पृष्ठे : १०+छावा पुरवणी • पाच रुपये • शनिवार १२ डिसेंबर २०२०, पुणे C (पुणे/अहमदनगर/सोलापूर आवृत्ती)

## जिल्हा वृत्त

# गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खासदार शरद पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या माध्यमातून मागील दोन वर्षातील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी देवेंद्र बुट्टेपाटील, कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. आभार प्रा. एस. एन. टाकळकर यांनी मानले.

लोकमत

# खेड तालुक्यात १२९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम : ८ लाख ३३ हजार रकमेचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर:** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



**शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करताना संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील व पदाधिकारी.**

या माध्यमातून मागील दोन वर्षातील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ॲड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४६ विद्यार्थिनींना सुमारे २ लाख ९२ हजार, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे ३ लाख १८ हजार, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना ९२ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख ३० हजार असे एकूण ८ लाख ३३ हजार रूपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले.

कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत ८ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द करण्यात आला.

या प्रसंगी ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, धर्मराज पवळे, सी.ए. सागर पिंगळे, आकांक्षा वाडेकर यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार प्रा. एस. एन. टाकळकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jul 16, 2021
Powered by: erelego.com

वर्ष ६५
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. १६ जुलै २०२१

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप



**राजगुरुनगर (दै. संध्या) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खासदार शरद पवार यांच्या पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टेपाटील आणि दत्तात्रेय वळसेपाटील यांच्या नावाने गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या माध्यमातून मागील दोन वर्षातील १२९ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ८ लाख ३३ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, लालचंद कर्नावट, ड. माणिक पाटोळे, सुभाष टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. या शिष्यवृत्तीसाठी गुणवंत परंतु आई-वडील नसलेले, मागास प्रवर्गातील, आदिवासी, अंध-अपंग, आर्थिक दुर्बल तसेच क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ४६ विद्यार्थिनींना सुमारे २ लाख ९२ हजार रु., शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत ४५ विद्यार्थिनींना सुमारे ३ लाख १८ हजार, साहेबरावजी बुट्टेपाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना ९२ हजार तसेच दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत १९ विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख ३० हजार असे एकूण ८ लाख ३३ हजार रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत आठ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश सुपूर्द करण्यात आला. नुकतेच सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर पिंगळे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षेत अकौन्टसी विषयात सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थिनी आकांक्षा वाडेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**